# राजर्षी
## विद्यार्थ्यांना आवाहन

**प्रिय विद्यार्थी, मित्र मैत्रिणींनो,**

दरवर्षीप्रमाणे **सन २०२३–२०२४** साठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विचारांचा आरसा असलेल्या **'राजर्षी'** या वार्षिक अंकाचे काम सुरु झाले आहे. यावर्षी आपल्या आवडीच्या वेगवेगळ्या विषयावर (संकीर्ण) आपण लेख लिहिणार आहोत.

सध्याच्या काळात अनेक सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक विषय आपल्यासमोर आहेत. याशिवाय इतरही अनेक विषय भेडसावत आहेत. या विषयाच्या अनुषंगाने आपण ५००/१००० शब्दांत लेख लिहावेत. प्रामुख्याने आपला लेख सामाजिक, ऐतिहासिक, विज्ञान, शिक्षण, कृषी, आरोग्य आहार, रुढी–परंपरा, सण–उत्सव, पर्यावरण, प्रसारमाध्यमे अशा विविध विषयांवर एक मुक्त चिंतण करणारा असावा. विशेषतः सामाजिक भान असलेला असावा.

दिवसेंदिवस अलीकडच्या कालखंडात वरील विषयांबाबत अनेक गुंतागुंतिचे प्रश्न निर्माण झाले आहेत. या निमित्ताने आपल्याला ते वाचकांसमोर मांडता येतील. तर चला.. हातात लेखनी घेऊया व लेखांमध्ये वास्तव शब्दबध्द करुया... !

- ✓ लेख लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांचा लेख व फोटो अंकात छापला जाईल.
- ✓ प्रत्येक भाषेत (मराठी, हिंदी, इंग्रजी) लेख लिहिणाऱ्या प्रथम दोन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षिस दिले जाईल.
- ✓ आपला लेख हा स्वलिखित असावा. संदर्भ पुस्तकाचा वापर केल्यास लेखाच्या शेवटी संदर्भ ग्रंथांची नावे लिहावीत.
- ✓ लेख जमा करण्याचा अंतिम दिनांक : ३१ डिसेंबर २०२३

**खालील प्राध्यापकांकडे आपले लेख व फोटो जमा करावा.**

| वरिष्ठ महाविद्यालय | कनिष्ठ महाविद्यालय |
|---|---|
| • मराठी : डॉ. दीपक गायकवाड<br>• हिंदी : डॉ. मीना ठाकूर<br>• इंग्रजी : प्रा. नयनिका वाघमारे | मराठी व हिंदी : प्रा. शुभांगी भोसले<br>इंग्रजी : प्रा. पी. एम. चव्हाण |

(डॉ. दीपक गायकवाड)
संपादक (मो. ९०४९०९७०३७)

(डॉ. विलास पाटील)
प्रभारी प्राचार्य